स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



# SPECIAL CELL

**Phone: (02462) 229245**
**Fax : (02462) 229574**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: splecellsrtmun@gmail.com**

जाक./विशेष कक्ष/२०१५.२०१६/१४०५ दिनांक : २४.०९.२०१५.

**प्रति,**
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित अशासकीय महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : शासन निर्णय दिनांक २४.०४.१९९५ अन्वये शिक्षक संवर्गाच्या पदाची संवर्ग व विषयनिहाय बिंदुनामावली नोंदवही तयार करून प्राथमीक पडताळणी करून घेणे बाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय क.न्यायाप्र-२०१४/(प्र.क.३२१/१४)/विशि-१ दिनांक २४.०८.२०१५.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/संस्था, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांना शासन निर्णय दिनांक २४.०४.१९९५ अन्वये संवर्ग व विषयनिहाय आरक्षण ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २२.०१.२०१४ मधील तरतुदीनुसार ज्या संस्था/महाविद्यालयांनी शिक्षक संवर्गाच्या पदाच्या बिंदुनामावल्या तयार करून शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२००९ अन्वये कार्यवाही केलेली होती. परंतु शासनाने दरम्यानच्या कालावधीत शासन निर्णय दिनांक २४.०८.२०१५ नुसार शासन निर्णय दिनांक २२.०१.२०१४ अधिक्रमीत करून शासन निर्णय दिनांक २४.०४.१९९५ अन्वये घेण्यात आलेला संवर्ग व विषयनिहाय आरक्षण ठेवण्याबाबतचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. तेंव्हा संस्था/महाविद्यालयांनी दिनांक २४.०४.१९९५ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासन निर्णय दिनांक २९.०३.१९९७ नुसार विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक संवर्गाच्या पदाच्या सुधारीत संवर्ग व विषयनिहाय बिंदुनामावल्या तयार करून आवश्यक त्या कागदपत्रासह विशेष कक्ष विभागात सादर कराव्यात.

:: ०२ ::

त्यानंतर शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२००९ मधील तरतुदीनुसार प्राथमिक पडताळणी करून मा.सहा.आयुक्त (मावक),आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे अंतीम पडताळणीसाठी अग्रेषीत केली जाईल. सदर कार्यालयाकडून अंतीम पडताळणी झाल्यानंतरच रिक्त पदास आरक्षण निर्धारीत करून रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही केली जाईल. ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत/-
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ